**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/५५/२०२४

दिनांक -२४.०२.२०२५

**प्रति,**

१. महेश मनोहर म्हमाणे
२. बबन ईश्वरा म्हमाणे
३. मिलींद मनोहर म्हमाणे
४. कमल मनोहर म्हमाणे
५. अश्विनी अशोक पाटील
६. पितांबर बबन म्हमाणे

सर्व रा. धावडवाडी, ता.जत, जि. सांगली .... **अपिलार्थी**

**<u>विरुध्द</u>**

१. संजय महादेव म्हमाणे
२. विश्वास आण्णाप्पा वाघमारे
३. दिनेश महादेव म्हमाणे
४. राजश्री दिपक म्हमाणे
५. संजीवनी दिपक म्हमाणे

सर्व रा.धावडवाडी, ता.जत, जि.सांगली ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**<u>निकालपत्र.</u>**

**<u>वाद मिळकतीचा तपशिल.</u>**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| धावडवाडी | जत | १३४ | ०८ हे.६७२ आर., पो.ख.०० हे. ०० आर. | ०१ हे. ३० आर., पो.ख.०० हे.०० आर. | ११५८ |

मौजे धावडवाडी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, कुंभारी यांनी फेरफार नंबर ११५८, प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिल प्रकरणी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी युक्तीवादमध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत ही अर्जदार नं. २ यांचे वडील व जाबदार नं.१ श्री.महेश मनोहर म्हमाणे, व अर्जदार नं. ३, अर्जदार नं. ५., अर्जदार नं. ६, व जाबदार,. जाबदार नं. ३., यांचे आजोबा व अर्जदार नं. ४. यांचे सासरे, व जाबदार नं. ४. यांचे आजे सासरे, व जाबदार नं. ५ यांचे पनजोबा कै.ईश्वरा सावळा म्हमाणे यांची होती. त्यांचे हयाती नंतर वारसा फेरफार नं. २१ येथे सन १९८० साली वारसा

नोंद होऊन १. महादेव ईश्वरा म्हमाणे २. मनोहर ईश्वरा म्हमाणे, ३.बबन ईश्वरा म्हमाणे यांचा प्रत्येकी पाच आणे चार पै चा हिस्सा नोंद झालेला होता.

२.. जाबदार नं. १ व ३, चे वडील व ४ व ५ यांचे सासरे महादेव ईश्वरा म्हमाने हे मयत झालेनंतर वारसा फेरफार नं. ३४२ येथे जाबदार १, ३ व २. दिपक महादेव म्हमाणे, ४. श्रीमती शकुंतला महादेव म्हमाणे यांचा वारसा झालेला आहे. वारसदार नं २. दिपक महादेव म्हमाणे ३. दिनेश महादेव म्हमाणे. ४. श्रीमती शकुंतला महादेव म्हमाणे यांनी आपले वडील/पती महादेव इश्वरा म्हमाणे यांचेकडून वारसदार नं. १ ते ४ यांना वारसा हक्काने आलेली पाच आणे चार पै हिस्सेचे क्षेत्र हे २.८७ आर मध्ये प्रत्येकी चार आणे प्रमाणे हिस्से करून त्यापैकी नं. १ संजय महादेव म्हमाणे यांचे १/४ हिस्सेचे क्षेत्र हे. ०.७२ वगळून उर्वरीत वारसदार नं २. दिपक महादेव म्हमाणे. ३. दिनेश महादेव म्हमाणे. ४. श्रीमती शकुंतला महादेव म्हमाणे यांचे तीघांचे हिस्सेचे क्षेत्र २.१५ आर ची जमीन १. श्री मनोहर ईश्वरा म्हमाणे. २. श्री.बबन ईश्वरा म्हमाणे यांना विक्री केलेली होती. व तीच जमीन नं २. दिपक महादेव म्हमाणे ३. दिनेश महादेव म्हमाणे. ४. श्रीमती शकुंतला महादेव म्हमाणे यांनी १. श्री मनोहर ईश्वरा म्हमाणे. २. श्री. ववन ईश्वरा म्हमाणे यांचेकडून रिकन्वेन्सपत्र (परत खरेदीपत्र) करून घेतलेले आहे. त्यापैकीच क्षेत्र हे. ०.९५ आर ची जमीन महेश मनोहर म्हमाणे यांना १८.०७.२००३ च्या खरेदीपत्राने दिलेली आहे. व उर्वरीत क्षेत्र हे.१.२० आर ची जमीन २. दिपक महादेव म्हमाणे ३. दिनेश महादेव म्हमाणे ४. श्रीमती शकुंतला महादेव म्हमाणे यांचे नांवे समाईकात नोंद होती व क्षेत्र हे. ०.७२ आर ची जमीन संजय महादेव म्हमाणे यांचे नांवे शिल्लख रहात असताना संजय महादेव म्हमाणे यांचे नांवे पाच आणे चार पै तसेच राहून गेलेले होते. वरील पैकी दिपक महादेव म्हमाणे हे मयत झालेनंतर वारसा फेरफार नं. ६९६ येथे १. राजश्री दिपक म्हमाणे २. संजिवनी दिपक म्हमाणे यांचा वारसा समाईक क्षेत्र ०१.२० हे.आर क्षेत्रालाच लागलेला आहे.

३. अर्जदार नं. १ व २ यांचे वडील कै. मनोहर ईश्वरा म्हमाणे हे दिनांक १३.१२.२०१९ रोजी मयत झालेनंतर वारसा फेरफार नं १०३० येथे अपिलार्थी १,३,४,५ यांचा वारसा नोंद झालेला आहे व मयत मनोहर ईश्वरा म्हमाणे यांचे नांवचे पाच आणे चार पैचे क्षेत्र हे, २.८७ आर होत असताना त्यांचे नांवे ऑनलाईन ७/१२ सदरी क्षेत्र हे. २.५५ आर चे चुकीचे क्षेत्र नोंद झालेले आहे.

४. अपिलार्थी २ यांचे नांवे पाच आणे चार पै चे क्षेत्र हे. २.८७ होत असताना यांचे नांवे ऑनलाईन ७/१२ सदरी क्षेत्र हे. २.६२ आर चे चुकीचे क्षेत्र नोंद झालेले होते त्यांनी त्यापैकी क्षेत्र हे. ०.८० आर ची जमीन आपला मुलगा अपिलार्थी ६ यांचे नांवे खरेदी करून दिलेले आहे. त्याची नोंद फेरफार नं. ११५० येथे झालेली आहे.

५. जाबदार १ यांचे नांवे नजर चुकीने पाच आणे चार पै ची आणेवारी नमुद असल्याने हस्तलिखीत ७/१२ वरून संगणकीकृत ७/१२ तयार करताना जाबदार १ यांचे नांवे क्षेत्र हे. ०.७२ जात असताना तलाठी धावडवाडी यांनी क्षेत्र हे. १.३० आर ची म्हणजे क्षेत्र हे. ०.५८ आर चे जादा क्षेत्र नोंद केलेले आहे. व कमल मनोहर म्हमाणे वगैरे यांचे खाते. १२७ मधील क्षेत्र ०.३२ आर व ववन ईश्वरा म्हमाणे यांचे खाते नं १०९३ मधील क्षेत्र हे.०.२५ आर असे मिळून क्षेत्र हे. ०.५७ आर कमी केलेले आहे. ही वाव चुकीची आहे. ते क्षेत्र दुरूस्ती बाबत अर्जदार यांनी तलाठी धावडवाडी व मंडळ अधिकारी कुंभारी तसेच तहसिलदार जत यांचा सल्ला घेतले नंतर गट नं. १३४ मध्ये ७/१२ एडीटींग व

रिरायटींग मध्ये चुकीचे नोंद झालेमुळे सदर क्षेत्र दुरूस्तीबाबत म.ज.म.स. १९६६ चे कलम १५५ नुसार दुरूस्ती तहसिलदार जत यांचेकडे अर्ज करणार आहोत. मात्र सद्या संजय महादेव यांनी आपल्या नांवे चुकीचे नमुद क्षेत्र हे. १.३० आर ची खरेदी दिलेली असल्याने व त्याची नोंद फेरफार नं ११५८ येथे मंजूर असल्याने ती रद्द करणे कामी प्रस्तूतचे अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरले असल्याने प्रस्तूत अपील दाखल केलेले आहे.

**जाबदार ३ ते ५ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अर्जदार नं. १ व ३ वडील कै.मनोहर ईश्वरा म्हमाणे हे दिनांक १३.१२.२०१९ रोजी मयत झालेनंतर वारसा फेरफार नं. १०३० येथे १. श्रीमती कमल मनोहर म्हमाणे २. महेश मनोहर म्हमाणे ३. मिलींद मनोहर म्हमाणे ४. अश्विनी अशोक पाटील यांचा वारसा नोंद झालेला आहे व मयत मनोहर ईश्वरा म्हमाणे यांचे नांवचे पाच आणे चार पैचे क्षेत्र हे. २.८७ आर होत असताना त्यांचे नांवे ऑनलाईन ७/१२ सदरी क्षेत्र हे. २.५५ आर चे चुकीचे क्षेत्र नोंद झालेले आहे

२. बबन ईश्वरा म्हमाणे यांचे नांवे पाच आणे चार पै चे क्षेत्र हे. २.८७ होत असताना यांचे नांवे ऑनलाईन ७/१२ सदरी क्षेत्र हे. २.६२ आर चे चुकीचे क्षेत्र नोंद झालेले होते त्यांनी त्यापैकी क्षेत्र है. ०.८० आर ची जमीन आपला मुलगा पितांबर बबन म्हमाणे यांचे नांवे खरेदी करून दिलेले आहे त्याची नोंद फेरफार नं. ११५० येथे झालेली आहे.

३. संजय महादेव म्हमाणे यांचे नांवे नजर चुकीने पाच आणे चार पै ची आणेवारी नमुद असल्याने हस्तलिखीत ७/१२ वरून संगणकीकृत ७/१२ तयार करताना संजय महादेव म्हमाणे यांचे नांवे क्षेत्र हे. ०.७२ जात असताना तलाठी धावडवाडी यांनी क्षेत्र हे. १.३० आर ची म्हणजे क्षेत्र हे. ०.५८ आर चे जादा क्षेत्र नोंद केलेले आहे व कमल मनोहर म्हमाणे वगैरे यांचे खाते १२७ मधील क्षेत्र ०.३२ आर व बबन ईश्वरा म्हमाणे यांचे खाते नं १०९३ मधील क्षेत्र हे. ०.२५ आर अम मिळून क्षेत्र हे. ०.५७ आर कमी केलेले आहे. ही वाव चुकीची आहे मद्या मंजय महादेव म्हमाणे यांनी आपल्या नांवे चुकीचे नमुद क्षेत्र हे. १.३० आर ची खरेदी दिलेली असल्याने व त्याची नोंद फेरफार नं ११५८ येथे मंजूर असल्याने ती रद्द करणे कामी प्रस्तूतचे अपील दाखल केलेले आहे.

**जाबदार २ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी चे अपीलातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असल्याने यातील जाबदार यांना मान्य व कबूल नाही. अपिलार्थी ने केवळ चुकीची व खोटी कारणे नमूद करुन अपील दाखल केले आहे ते चालणेस पात्र नाही सबब ते रद्द करणेत यावा.

२. अपिलार्थी ने खरी वस्तुस्थिती कोर्टापासून लपवून ठेऊन जे अपील दाखल केले आहे ते चुकीचे असून रद्दबातल करणेत यावे. अपिलार्थीचे अपीलातील मिळकतीचे वर्णन अर्धवट चुकीचे असून ते जाबदार यांना मान्य व कबूल नाही. तसेच अपिलार्थी यांनी ज्या मिळकती बाबत वा ज्या क्षेत्राबाबत दाद मागत आहे त्याच्या चर्तुसिमाही नमूद केलेल्या नाहीत याचा अर्थ असा की सदर मिळकती बाबत अपिलार्थी यांना कोणत्याही प्रकारची माहिती नाही हे स्पष्टपणे दिसून येते.

३. अपिलार्थी यांनी नमूद केले प्रमाणे कोणतेही वस्तुस्थिती दर्शवणारे कागद या कोर्टा समोर सादर केलेले नाहीत. अपिलार्थी ने नमूद केले आहे की तांत्रीक चुका झाल्यामुळे जाबदाराचे नावे जादा क्षेत्र

लागले परंतु त्या बाबत कोणत्याही ठिकाणी दाद मागीतले बाबत वा त्या बाबत नमूद केलेले नाही. यावरुन ही अपिलार्थी चा बनावटपणा दिसून येतो. तसेच अपिलार्थी हे सुशिक्षीत असून त्या बाबत आज तागायत का दाद मागीतली नाही हे ही नमूद नाही. अपिलार्थी त्यांचे अपिलातील पॅरा ४ मध्ये नमूद करतात की क्षेत्र दुरुस्ती बाबत तहसिलदार, यांचे कडे अर्ज करणार आहोत परंतु अपिलार्थी पहीला अपील दाखल करतात नंतर तहसिलदार यांचे कडे दुरुस्ती मागतात हे हास्यास्पद आहे. जाबदार नं. १ यानी त्यांचे घर प्रपंचाचे अडचणीकरीता सदर मिळकत ही विक्रीस काढली होती व ती यातील जाबदार नं.२ यांना जगजाहीर पणे खुष खरेदी दस्त क्र. ४९४४/२०२३ रोजीचे दस्ताने विक्री केली असून त्यांची नोंद गावचे फेरफार सदरी फे.नं. ११५८ ने धरणेत आलेली असून ती कायदेशीर व योग्यच आहे.

४. जाबदार नं.१ यांनी जाबदार नं.२ यांना जो दस्त क्र.४९४४/२०२३ हा करुन दिलेला असून तो आज अखेर कोणत्याही मे. कोर्टाने रद्दबातल ठरवला नाही. व त्या बाबत कोणत्याही मे. कोर्टाचा स्थगितीचा आदेश ही नाही. त्यामुळे मंडळ अधिकारी यांनी जो फे.नं. ११५८ ची नोंद मंजूरीचा आदेश केला आहे तो कायदेशीर व योग्यच आहे. तसेच अपिलार्थी नमूद करतात त्या सर्व बाबी या मे.दिवाणी न्यायालयाच्या अखत्यारीत येतात.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे धावडवाडी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, कुंभारी यांनी फेरफार नंबर ११५८, प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

२. प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, वादातीत फेरफार क्र.११५८ ने जाबदार ०१ यांनी जाबदार ०२ यांना खरेदी करून दिलेल्या खरेदी दस्त क्र.४९४८ ची नोंद मंजूर केलेचे दिसून येते. वाद मिळकत गट नंबर १३४ चे सन १९८० पासूनचे ७/१२ उतारे व फेरफार यांचे अवलोकन केले असता खरेदी देणार जाबदार ०१ यांचे नांवे नमूद असलेले १.३० हे.आर क्षेत्र हे प्रथमदर्शनी चुकीचे असलेचे दिसून येते. त्यामुळे खरेदी देणार यांनी त्यांच्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्र खरेदीदस्ताने हस्तांतरीत केलेचे स्पष्ट होते.

३.- वास्तविक जाबदार ०१ यांचे वडील म्हणजेच महादेव ईश्वरा म्हमाने यांना सदर गट नं. १३४ मध्ये ५ आणे ४ पै म्हणजेच २.८७ हे.आर इतके क्षेत्राची मालकी प्राप्त झालेचे दिसून येते. त्यापैकी महादेव ईश्वरा म्हमाणे यांचे संजय म्हमाणे व्यतिरिक्तचे वारसदार यांचे नांवे १.२० हे.आर व त्यांनी महेश मनोहर माने यांना विक्री केलेले क्षेत्र ०.९५ हे.आर क्षेत्र वजा करता संजय म्हमाणे यांना केवळ ०.७२ हे.आर क्षेत्राचा मालकी हक्क प्राप्त होतो. असे असतांना केवळ अधिकार अभिलेख सदरी १.३० हे.आर क्षेत्र नमूद असलेने जाबदार ०१ यांनी जाबदार ०२ यांना नोंदणीकृत खरेदीदस्ताने प्रत्यक्ष त्यांना प्राप्त हिस्सा/क्षेत्र पेक्षा जास्त हिस्सा/क्षेत्र विक्री केलेचे सिध्द होते. सबब वाद मिळकतीच्या भोगवटादार सदरी असलेल्या सर्व खातेदारांचे क्षेत्र महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर क्षेत्रात दुरूस्ती होईपर्यंत सदरच्या खरेदी दस्ताची नोंद घेतलेस कायदेशीर गुंतागुंत निर्माण होणार असलेने व जाबदार ०१ यांना कायेदशीररित्या

प्रत्यक्ष प्राप्त क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र जाबदार ०२ यांना विक्री केलेले असलेने वादातीत फेरफार रद्द करणे योग्य व न्यायाचे होणार आहे. यास्तव मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

**अपिलार्थी यांचे अपील मान्य करणेत येवून मौजे धावडवाडी ता. जत येथील फेरफार नोंद नंबर ११५८ ची नोंद रद्द करण्याचा आदेश देण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.